॥ श्री नवनाथभक्तिसार ॥

Shri Navnath Bhaktisar

ADHYAYA 5 --- PANCHAMODHYAYA

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीपांडुरंगाय नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्रीमातापितृभ्यां नमः ।

Shri Ganeshaaya Namah | Shri Gurubhyo Namah | Shri Paandurangaaya Namah | Shri Kuladevataayai Namah | Shri Maataa pitribhyaam Namah |

Summary

__Machchindranath__ journeys into the terrifying wilderness of the __Bara Malhar__ forest, a dark wasteland completely overrun by millions of flesh-eating ghouls and evil spirits. When a massive horde of wandering ghosts rushes to devour him, the master remains unshakeable and unleashes the mystical __Sparsh-Astra__ (paralysing weapon), instantly freezing the entire demonic vanguard into completely rigid stone statues. Enraged by this absolute defiance, the supreme king of ghosts, __Veer Vetal__, manifests alongside his eight powerful chief captains to challenge the yogi directly.

A fierce, chaotic battle of dark sorcery versus divine mantra power erupts across the forest. Despite Veer Vetal's colossal strength and illusions, Machchindra overpowers the ghost army using a blinding Agni-Astra (fire weapon) that consumes their spectral forces. Seeing his captains defeated, a humbled Vetal submits entirely to the Nath master. Moving with deep compassion, Machchindra uses his sacred Bhasma to instantly heal the ghosts' burns. In profound gratitude, Veer Vetal enters a binding spiritual pact, pledging that he and his entire ghostly realm will eternally protect anyone who reverently recites this chapter or keeps it in their home.

Ovee 1

जयजयाजी यदुकुळतिळका । भक्तिपंकजाच्या सदैव अर्का । मुनिमानसचकोरपाळका । कृपापीयुषा चंडा तूं ॥ १ ॥

Transliteration

Jaya-jaya-ji Yadu-kula-tilakaa | Bhakti-pankajaachyaa sadaiva Arkaa | Muni-maanasa-chakora-paalakaa | Kripaa-peeyushaa Chandaa too ||

Ovee 2

भाविक प्रेमळ भक्त परी । तयांचा अससी पूर्ण कैवारी । बाळप्रल्हाद संकटवरी । कोरडे काष्ठीं प्रगटलासी ॥ २ ॥

Transliteration

Bhaavika premala bhakta paree | Tayaanchaa asasee poorna kaivaaree | Baala Pralhaada sankatavaree | Korade kaashthee pragatalaasee ||

Ovee 3

करविंशतिप्रताप सघन । संकटीं घातले देव तेणें । तदर्थ सकळ रविकुळपाळण । अवतारदीक्षा मिरविसी ॥ ३ ॥

Transliteration

Kara-vinshati-prataapa saghanu | Sankatee ghaatale deva tene | Tadartha sakala Ravi-kula-paalanu | Avataara deekshaa miravisee ||

Ovee 4

देवविप्रांचें संकट पाहून । मत्स्यकुळातें करी धारण । मग उदधीतें गगन दावून । शंखासुर धरियेला ॥ ४ ॥

Transliteration

Deva-vipraanche sankata paahuunu | Matsya-kulaate karee dhaaranu | Maga udadheete gagana daavuunu | Shankhaasura dhariyelaa ||

Ovee 5

तेवींच दैत्य दुमदुमा करीत । अवतार कच्छ झाला मिरवीत । उदधी मंथूनि शंखा तोषवीत । महाराज कृपार्णव ॥ ५ ॥

Transliteration

Teveencha daitya dumadumaa kareetu | Avataara Kachcha jhaalaa miraveetu | Udadhee manthuuni shankhaa toshaveetu | Mahaaraaja kripaarnava ||

Ovee 6

राया बळीची उद्दाम करणी । स्वरुप मिरवी खुजटपणी । संकट पडतां सुरगणी । फरशधर झालासे ॥ ६ ॥

Transliteration

Raayaa Baleechee uddaama karanee | Svarupa miravee khujata-panee | Sankata padataa suraganee | Pharashadhara jhaalaase ||

Ovee 7

अपार भक्तप्रेमा सघन । त्यांत स्थिरावले पंडुनंदन । शिशुपाळ-वक्रदंतकंदन । वसुदेवकुशीं मितवला ॥ ७ ॥

Transliteration

Apaara bhakta-premaa saghanu | Tyaata sthiraavale Pandu-nandanu | Shishupaala vakra-danta-kandanu | Vasudeva-kushee miravalaa ||

Ovee 8

असो ऐसा भक्तिप्रेमा । तूंतें आवडे मेघश्यामा । तरी भावभक्तिच्या उगमा । पुढें ग्रंथ बोलवीं ॥ ८ ॥

Transliteration

Aso aisaa bhakti-premaa | Toonte aavade Meghashyaamaa | Taree bhaava bhakti chyaa ugamaa | Pudhe grantha bolavee ||

Ovee 9

मागिले अध्यायीं केले कथन । हिंगळाज क्षेत्रीं मच्छिंद्रनंदन । अष्टभैरव चामुंडा जिंकून । दर्शन केलें अंबेचें ॥ ९ ॥

Transliteration

Maagile adhyaayee kele kathanu | Hingalaaja kshetree Machchindra nandanu | Ashta Bhairava Chaamundaa jinkuunu | Darshana kele Ambeche ||

Ovee 10

तरी श्रोते सिंहावलोकनीं । कथा पहा आपुले मनीं । बारामल्हारमार्ग धरुनी । जाता झाला मच्छिंद्र ॥ १० ॥

Transliteration

Taree shrote sinha-avalokanee | Kathaa pahaa aapule manee | Baaraamalhaara-maarga dharunee | Jaataa jhaalaa Machchindra ||

Ovee 11

तो बारामल्हारकाननांत । मुक्कामा उतरला एका गावांत । देवालयीं मच्छिंद्रनाथ । सुखशयनीं पहुडला ॥ ११ ॥

Transliteration

Toh Baaraamalhaara-kaananaantu | Mukkaamaa utaralaa ekaa gaavaantu | Devaalayee Machchindra-Naathu | Sukha shayanee pahudalaa ||

Ovee 12

तों रात्र झाली दोन प्रहर । जागृत आहे नाथ मच्छिंद्र । तंव काननीं दिवट्या अपार । मच्छिंद्रनाथें देखिल्या ॥ १२ ॥

Transliteration

Toh raatra jhaalee dona praharu | Jaagrita aahe Naatha Machchindru | Tava kaananee divatyaa apaaru | Machchindra-Naathe dekhilyaa ||

Ovee 13

इकडूनि जाती तिकडूनि येती । ऐशा येरझारा करिती । तें पाहुनि नाथ जती । म्हणे भुतावळें उदेले ॥ १३ ॥

Transliteration

Ikaduuni jaatee tikaduuni yetee | Aishaa yerajhaaraa karitee | Tey paahuni Naatha jatee | Mhane bhutaavale udele ||

Ovee 14

तरी यातें करावें प्रसन्न । समय येत हाचि दिसून । कोण्या तरी कार्यालागून । उपयोगीं श्रम पडतील ॥ १४ ॥

Transliteration

Taree yaate karaave prasannu | Samaya yeta haachi disuunu | Konyaa taree kaaryaa-laaguunu | Upayogee shrama padateela ||

Ovee 15

तरी त्यातें आतां शरणागत । प्रसन्न करुनि घ्यावें भूत । श्रोते म्हणती कार्य कोणतें । भूतास्वाधीन असेल कीं ॥ १५ ॥

Transliteration

Taree tyaate aataa sharana-aagatu | Prasanna karuni ghyaave bhootu | Shrote mhanatee kaarya konate | Bhootaa svaadheena asela kee ||

Ovee 16

तरी ऐसें न बोलावें या वेळे । भूत श्रीराम उपयोगी आलें । राक्षसाचें प्रेत नेलें । समरंगणीं सुवेळे ॥ १६ ॥

Transliteration

Taree aise na bolaave yaa vele | Bhoota Shree Raama upayogee aale | Raakshasaache preta nele | Samaranganee Suvele ||

Ovee 17

तेव्हां अमृतदृष्टीकरुन । उठवी श्येन कपिरत्न । तेवीं तुळसीसी प्रसन्न । भूत झालें कलींत ॥ १७ ॥

Transliteration

Tevhaa amrita-drishtee-karunu | Uthavee shyena kapiratnu | Tevee Tulaseesee prasannu | Bhoota jhaale kaleentu ||

Ovee 18

तरी लहानापासूनि थोरापर्यंत । समयीं कार्य घडूनि येत । पहा अर्णवा झुरळें निश्चित । वांचविलें म्हणताती ॥ १८ ॥

Transliteration

Taree lahaanaa-paasuuni thoraa-paryantu | Samayee kaarya ghaduuni yetu | Pahaa arnavaa jhurale nishchitu | Vaanchavile mhanataatee ||

Ovee 19

तन्न्यायें कल्पूनि चित्तीं । नाथ भूतांच्या बैसल्या अर्थी । मग अंबिकाअस्त्र स्पर्शशक्ती । प्रेरिता झाला तेचि क्षणी ॥ १९ ॥

Transliteration

Tannyaaye kalpuuni chittee | Naatha bhootaanchyaa baisalyaa arthee | Maga Ambikaa-astra sparsha shaktee | Preritaa jhaalaa techi kshanee ||

Ovee 20

तें अस्त्र प्रेरितां भूतगणीं । होतां स्पर्श कुरुमेदिनीं । मग पद धरी आंवळूनि । सुटका नाहीं पदातें ॥ २० ॥

Transliteration

Tey astra preritaa bhootaganee | Hotaa sparsha kurumedinee | Maga pada dharee aavaluuni | Sutakaa naahee padaate ||

Ovee 21

जेवी युद्ध कुरुक्षेत्रांत । मही धरीतसे कर्णरथ । चक्रें गिळुनि करी कुंठित । गमनसंधान करुं नेदी ॥ २१ ॥

Transliteration

Jevee yuddha Kuru-kshetraantu | Mahee dhareetase karnarathu | Chakre giluni karee kunthitu | Gamana sandhaana karu nedee ||

Ovee 22

तन्न्यायें स्पर्शशक्ती । करी भूतपदा धरा व्यक्ती । चलनवलन मग त्या क्षितीं । कांहीएक चालेना ॥ २२ ॥

Transliteration

Tannyaaye sparsha shaktee | Karee bhootapadaa dharaa vyaktee | Chalanavalana maga tyaa kshitee | Kaanhee eka chaalenaa ||

Ovee 23

जैसे तरु एकाचि ठायीं । वसती अचळप्रवाहीं । तन्न्यायें भूतें सर्वही । खुंटोनियां टाकिलीं ॥ २३ ॥

Transliteration

Jaise taru ekaachi thaayee | Vasatee achala-pravaahee | Tannyaaye bhoote sarvahee | Khuntoniyaa taakilee ||

Ovee 24

तयां भूतांचे वियोगनिमित्ते । कीं वेताळा भेटी जाणें होतें । सर्व मिळोनि येतां क्षितींत । जमोनियां येताती ॥ २४ ॥

Transliteration

Tayaa bhootaanche viyoga-nimitte | Kee Vetaalaa bhetee jaane hote | Sarva miloni yetaa kshiteentu | Jamoniyaa yetaatee ||

Ovee 25

तंव ते दिवशीं झाले कुंठित । वेताळभेटीच राहिली अप्राप्त । येरीकडे वेताळ क्षितींत । अनंत भूतें पातलीं ॥ २५ ॥

Transliteration

Tava tey divashee jhaale kunthitu | Vetaala-bheteecha raahilee apraaptu | Yereekade Vetaala kshiteentu | Ananta bhoote paatalee ||

Ovee 26

तो दक्षभूतांचा बळी वेताळ । पाहे अष्टकोटी भूतावळ । तों न्यूनपणीं सर्व मंडळ । दिसून आलें तयातें ॥ २६ ॥

Transliteration

Toh daksha-bhootaanchaa balee Vetaalu | Paahe ashta kotee bhootaavalu | Toh nyuunapanee sarva mandalu | Disuuna aale tayaate ||

Ovee 27

मग अन्य भूतांतें विचारीत । शरभतीरींची भूतजमात । आली नाहीं किमर्थ । शोध त्यांचा करावा ॥ २७ ॥

Transliteration

Maga anya bhootaante vichaareetu | Sharabha-teereenchee bhoota-jamaatu | Aalee naahee kimarthu | Shodha tyaanchaa karaavaa ||

Ovee 28

अवश्य म्हणोनि पांच सात । गमन करिते झाले भूत । शरभतीरीं येऊनि त्वरित । निजदृष्टीं पहाती ॥ २८ ॥

Transliteration

Avashya mhanoni paancha saatu | Gamana karite jhaale bhootu | Sharabha-teeree yeuuni tvaritu | Nija-drishtee pahaatee ||

Ovee 29

तंव ते मंडळी महीं व्यक्त । उभी असे बळरहित । जैसा एका ठायींचा पर्वत । दुसऱ्या ठायीं आतळेना ॥ २९ ॥

Transliteration

Tava tey mandalee mahee vyaktu | Ubhee ase balarahitu | Jaisaa ekaa thaayeenchaa parvatu | Dusaryaa thaayee aatalenaa ||

Ovee 30

मग त्या मंडळानिकट येऊन । पुसते झाले वर्तमान । तुम्ही व्यक्त महीलागून । काय म्हणोनि तिष्ठलां ॥ ३० ॥

Transliteration

Maga tyaa mandalaa-nikata yeuunu | Pusate jhaale vartamaanu | Tumhee vyakta maheelaa-guunu | Kaaya mhanoni tishthalaa ||

Ovee 31

येरी म्हणती अनेक जे भेद । महीं उचलोनि देतां पद । कोण आला आहे सिद्ध । तेणें कळा रचियेली ॥ ३१ ॥

Transliteration

Yeree mhanatee aneka je bhedu | Mahee uchaloni detaa padu | Kona aalaa aahe siddhu | Tene kalaa rachiyelee ||

Ovee 32

मग ते पाहे कळा ऐकून । पर्वता चालिले शोधालागून । गुप्तरुपें वस्तींत येऊन । मच्छिंद्रनाथ पाहिला ॥ ३२ ॥

Transliteration

Maga tey paahe kalaa aikuunu | Parvataa chaalile shodhaa-laaguunu | Guptarupe vasteenta yeuunu | Machchindra-Naatha paahilaa ||

Ovee 33

बालार्क किरणीं तेजागळा । शेंदूर चर्चिलासे भाळा । तयामाजी विभुती सकळा । मुखचंद्रें चर्चिली ॥ ३३ ॥

Transliteration

Baalaarka kiranee tejaagalaa | Shendoora charchilaase bhaalaa | Tayaa maajee vibhutee sakalaa | Mukhachandre charchilee ||

Ovee 34

कर्णी मुद्रिका रत्नपाती । कीं वस्तीस पातल्या रत्नज्योती । हेमगुणी गुंफोनि निगुती । कबरींभारीं वेष्टिला ॥ ३४ ॥

Transliteration

Karnee mudrikaa ratnapaatee | Kee vasteesa paatalyaa ratnajyotee | Hemagunee gumphoni nigutee | Kabareem-bhaaree veshtilaa ||

Ovee 35

ललाट अफाट मिशा पिंगटा । वटदुग्धानें भरल्या जटा । सरळ नासिका नेत्रवाटा । अग्रीं समदृष्टीं पहातसे ॥ ३५ ॥

Transliteration

Lalaata aphaata mishaa pingataa | Vata-dugdhaane bharalyaa jataa | Sarala naasikaa netra vaataa | Agreen sama drishtee pahaatase ||

Ovee 36

अर्कनयनीं विशाळ बहुत । उग्रपणीं उदय दावीत । पाहतां वाटे कृतांत । नेत्रतेजें विराजला ॥ ३६ ॥

Transliteration

Arka nayanee vishaala bahutu | Ugrapanee udaya daaveetu | Paahataa vaate kritaantu | Netrateje viraajalaa ||

Ovee 37

स्थूळवट बाहुदंड सरळ । आजानुबाहु तेजाळ । कीं मलविमल करुनि स्थळ । बहुवटीं विराजले ॥ ३७ ॥

Transliteration

Sthoolavata baahu danda saralu | Aajaanu-baahu tejaalu | Kee malavimala karuni sthalu | Bahuvatee viraajale ||

Ovee 38

मस्तकीं शोभला दिव्य वीरगुंठी । कंथा विराजे पाठपोटीं । त्यावरी ग्रीवेसी नेसल्या दाटी । ज्ञानशिंगी मिरवीतसे ॥ ३८ ॥

Transliteration

Mastakee shobhalaa divya veera-gunthee | Kanthaa viraaje paatha potee | Tyaa-varee greevesee nesalyaa daatee | Jnyaana shingee miraveetase ||

Ovee 39

बाहुवटें हनुमंत । वीरकंकण करी शोभत । कुबडी फावडी घेऊनि हातांत । बोधशैलिका विराजे ॥ ३९ ॥

Transliteration

Baahuvate Hanumantu | Veera-kankana karee shobhatu | Kubadee phaavadee gheuuni haataantu | Bodha-shailikaa viraaje ||

Ovee 40

जैसा तीव्र बारावा रुद्र । कीं सकळ योगियांचा भद्र । जैसा नक्षत्रगणीं चंद्र । तेजामाजी डवरतसे ॥ ४० ॥

Transliteration

Jaisaa teevra baaraavaa rudru | Kee sakala yogiyaanchaa Bhadru | Jaisaa nakshatra-ganee chandru | Tejaa maajee davaratase ||

Ovee 41

ऐसें पाहून एक भूतीं । मनामाजीं करितां ख्याती । येणेंचि व्यक्त केलें क्षितीं । भूतगणा वाटतसे ॥ ४१ ॥

Transliteration

Aise paahuuna eka bhootee | Manaamaajee karitaa khyaatee | Yenenchi vyakta kele kshitee | Bhootaganaa vaatatase ||

Ovee 42

मग ते होऊनि संदेहस्थ । नाथासी म्हणती भूतें पतित । जाऊं द्या स्वामी करा मुक्त । आपुल्याला कार्यासी ॥ ४२ ॥

Transliteration

Maga tey houuni sandehasthu | Naathaasee mhanatee bhoote patitu | Jaaoo dyaa svaamee karaa muktu | Aapulyaalaa kaaryaasee ||

Ovee 43

नाथ म्हणे सर्व गुंतले । तुम्ही मुक्त केवीं राहिले । येरु म्हणे पाठविलें । समाचारा वेताळें ॥ ४३ ॥

Transliteration

Naatha mhane sarva guntale | Tumhee mukta kevee raahile | Yeru mhane paathavile | Samaachaaraa Vetaale ||

Ovee 44

तरी महाराजा करीं मुक्त । जाऊं द्या वेताळनमनार्थ । यावरी त्यांसी म्हणे नाथ । सोडणार नाहीं सहसाही ॥ ४४ ॥

Transliteration

Taree Mahaaraajaa karee muktu | Jaaoo dyaa Vetaala-namanaarthu | Yaavaree tyaansee mhane Naathu | Sodanaara naahee sahasaahee ||

Ovee 45

तुमचा वेताळ आदिराणीव । जाऊनि त्यातें त्वरें सांगावें । येरु म्हणती मग अपूर्व । भलें नोहे महाराजा ॥ ४५ ॥

Transliteration

Tumachaa Vetaala aadi-raaneevu | Jaauuni tyaate tvare saangaave | Yeru mhanatee maga apoorvu | Bhale nohe Mahaaraajaa ||

Ovee 46

वेताळ खवळता बाबरदेव । हे महाबळाचे असती अष्टार्णव । ब्रह्मांड जिंकूनि कंदुकभाव । महीं खेळती महाराजा ॥ ४६ ॥

Transliteration

Vetaala khavalataa Baabaradevu | Hey mahaa-balaache asatee ashtaarnavu | Brahmaanda jinkuuni kanduka-bhaavu | Mahee khelatee Mahaaraajaa ||

Ovee 47

नवनाग जैसे सबळी । तयां माजी फोडिती कळी । तयांसवें कोणी रळी । केली नाहीं आजन्म ॥ ४७ ॥

Transliteration

Navanaaga jaise sabalee | Tayaa maajee phoditee kalee | Tayaansave konee ralee | Kelee naahee aajanma ||

Ovee 48

देव दानव गंधर्व असती । तेही वेताळ बलाढ्य म्हणती । तस्मात् स्वामी तयांप्रती । श्रुत करुं नोहे जी ॥ ४८ ॥

Transliteration

Deva daanava gandharva asatee | Tehee Vetaala balaadhya mhanatee | Tasmaatu svaamee tayaampratee | Shruta karu nohe jee ||

Ovee 49

येरु म्हणे संपादणी । येथें काय करितां दाऊनि । तुमचा वेताळ पाहीन नयनीं । बळजेठी कैसा तो ॥ ४९ ॥

Transliteration

Yeru mhane sampaadanee | Yethe kaaya karitaa daauuni | Tumachaa Vetaala paaheena nayanee | Balajethee kaisaa toh ||

Ovee 50

ऐसी ऐकूनी भूतें मात । म्हणती अवश्य करुं श्रुत । मग जाती जेथ तो वेताळ भूत । तयापाशीं पातले ॥ ५० ॥

Transliteration

Aisee aikuunee bhoote maatu | Mhanatee avashya karu shrutu | Maga jaatee jetha toh Vetaala bhootu | Tayaa paashee paatale ||

Ovee 51

राया वेताळासी करुनि नमन । सांगते झाले वर्तमान । म्हणती महाराजा भूतांसी विघ्न । जोगी एक आहे कीं ॥ ५१ ॥

Transliteration

Raayaa Vetaalaasee karuni namanu | Saangate jhaale vartamaanu | Mhanatee Mahaaraajaa bhootaansee vighnu | Jogee eka aahe kee ||

Ovee 52

तेणें खेळूनि मंत्रशक्ती । महीं व्यक्त केली जमाती । शेवटीं म्हणतो हेंचि गती । तुम्हां करीन महाराजा ॥ ५२ ॥

Transliteration

Tene kheluuni mantra shaktee | Mahee vyakta kelee jamaatee | Shevatee mhanato henchi gatee | Tumhaa kareena Mahaaraajaa ||

Ovee 53

ऐसें ऐकूनि पिशाचराव । परम क्षोभला विकृतिभाव । म्हणे आतां अष्टका सर्व । भूतावळ मेळवा ॥ ५३ ॥

Transliteration

Aise aikuuni pishaacha raavu | Parama kshobhalaa vikriti-bhaavu | Mhane aataa ashtakaa sarvu | Bhootaavala melavaa ||

Ovee 54

मग भूतभृत्य जासूद हलकारे । जाते झाले देशांतरा । अर्बस्थान पंजाब गुर्जरा । बंगालादि पातले ॥ ५४ ॥

Transliteration

Maga bhoota-bhritya jaasooda halakaare | Jaate jhaale deshaantaraa | Arbasthaana Panjaaba Gurjaraa | Bangaalaadi paatale ||

Ovee 55

माळवी मेवाड तेलंगण । कर्नाटकी देश दक्षिण । कुंडाळ कैकाड विलंबवचन । सप्तदीपींचे पातले ॥ ५५ ॥

Transliteration

Maalavee Mevaada Telanganu | Karnaatakee desha dakshinu | Kundaala Kaikaada vilamba-vachanu | Sapta-deepeenche paatale ||

Ovee 56

सकळां श्रुत करुनि गोष्टी । पाठविती सकळ भूतथाटी । अष्टराणीव एक एक कोटी । समारंभा पातले ॥ ५६ ॥

Transliteration

Sakalaa shruta karuni goshtee | Paathavitee sakala bhoota-thaatee | Ashta-raaneeva eka eka kotee | Samaarambhaa paatale ||

Ovee 57

अष्टराणीव तयांचे नांव । महावीर विद्याकारणी सर्व । म्हंमद म्हैषासुर धुळोवान गर्वे । बाबर झोटिंग पातले ॥ ५७ ॥

Transliteration

Ashta-raaneeva tayaanche naavu | Mahaa veera vidyaa kaa ranee sarvu | Mhammada Mhaishaasura dhulovaana garve | Baabara Jhotinga paatale ||

Ovee 58

मुंजा वनरसिंहाचा अवतार । म्हणोनि वीरांत त्याचा संचार । तोही एक कोटी भार । घेऊनियां मिळाला ॥ ५८ ॥

Transliteration

Munjaa vanara-sinhaachaa avataaru | Mhanoni veeraanta tyaachaa sanchaaru | Tohee eka kotee bhaaru | Gheuuniyaa milaalaa ||

Ovee 59

असो ऐसे कोटी भार । उतरले जैसे गिरिवर । महाभद्र तो आग्या वेताळवीर । येऊनियां पोहोंचला ॥ ५९ ॥

Transliteration

Aso aise kotee bhaaru | Utarale jaise girivaru | Mahaabhadra toh Aagyaa Vetaala-veeru | Yeuuniyaa pohonchalaa ||

Ovee 60

सकळ वेताळापाशीं येऊन । कथिते झाले सिद्धगमन । मग सकळ सांगूनि वर्तमान । समारंभीं चालिले ॥ ६० ॥

Transliteration

Sakala Vetaalaa-paashee yeuunu | Kathite jhaale siddha gamanu | Maga sakala saanguuni vartamaanu | Samaarambhee chaalile ||

Ovee 61

येऊनि शरभतीराप्रती । अष्टही कोटी कोल्हाळ करिती । तेणें दणाणी अमरक्षिती । आणि पाताळी आदळतसे ॥ ६१ ॥

Transliteration

Yeuuni Sharabha-teeraa-pratee | Ashtahee kotee kolhaala karitee | Tene danaanee amara-kshitee | Aani paataalee aadalatase ||

Ovee 62

तें पाहूनि मच्छिंद्रनाथ । करीं कवळी विभूतिपात । आराधूनि मंत्रशक्तीतें । लखलखीत पैं केलें ॥ ६२ ॥

Transliteration

Tey paahuuni Machchindra-Naathu | Karee kavalee vibhootee-paatu | Aaraadhuuni mantra shakteete | Lakhalakheeta pai kele ||

Ovee 63

स्मरणगांडीव विभूती शर । सज्ज करिती अति तत्पर । परी सर्वांचा प्रताप पहावया स्थिर । महीं विराजे उगलाचि ॥ ६३ ॥

Transliteration

Smarana Gaandeeva vibhootee sharu | Sajja karitee ati tatparu | Paree sarvaanchaa prataapa pahaavayaa sthiru | Mahee viraaje ugalaachi ||

Ovee 64

परी वज्रास्त्रमंत्र जपून । भोवतें वेष्टिलें रेषारंगण । आणि मस्तकीं वज्रासन । वज्रशक्ती मिरवीतसे ॥ ६४ ॥

Transliteration

Paree Vajra astramantra japuunu | Bhovate veshtile reshaa-ranganu | Aani mastakee Vajraasanu | Vajra shaktee miraveetase ||

Ovee 65

तेणेंकरुनि भूतांचा प्रवेश । लिप्त नोहे आसपास । परी भूतावळ्या स्मशानास । वर्षाव करिती आगळा ॥ ६५ ॥

Transliteration

Tenenkaruni bhootaanchaa praveshu | Lipta nohe aasapaasu | Paree bhootaavalyaa smashaanaasu | Varshaava karitee aagalaa ||

Ovee 66

जैशा पर्जन्याच्या धारा । वर्षाव करिती अपार अंबरा । परी वज्रास्त्र सबळ मौळिभारा । कदाकाळीं मानीना ॥ ६६ ॥

Transliteration

Jaishaa parjanyaachyaa dhaaraa | Varshaava karitee apaara ambaraa | Paree Vajra-astra sabala maulee-bhaaraa | Kadaa-kaalee maaneenaa ||

Ovee 67

त्यांत अष्ट पिशाचनृपाळ । स्वरुपेंकरुनि अति विशाळे । तरु टाकिती उपटूनि बळें । पर्जन्यधारांसारिखे ॥ ६७ ॥

Transliteration

Tyaata ashta pishaacha nripaalu | Svarupen-karuni ati vishaale | Taru taakitee upatuuni bale | Parjanya-dhaaraan-saarikhe ||

Ovee 68

परा तें वज्रास्त्र मौळीं । तया न गणिती तये काळीं । तरु संचवूनि पर्वतमौळी । पर्णकुटी ती जाहली ॥ ६८ ॥

Transliteration

Paraa tey Vajra-astra maulee | Tayaa na ganitee taye kaalee | Taru sanchavuuni parvata maulee | Parnakutee tee jaahalee ||

Ovee 69

ऐसा संचरतां तरुभार । काय करिते झाले समग्र । कोरडे काष्ठादि तृण अपार । तयावरी सांडिती ॥ ६९ ॥

Transliteration

Aisaa sancharataa taru bhaaru | Kaaya karite jhaale samagru | Korade kaashthaadi trina apaaru | Tayaa-varee saanditee ||

Ovee 70

सकळ करुनि महाकहर । सांडिते झाले वैश्वानर । तें पाहूनि नाथ मच्छिंद्र । जलदास्त्र प्रेरीतसे ॥ ७० ॥

Transliteration

Sakala karuni mahaakaharu | Saandite jhaale vaishvaanaru | Tey paahuuni Naatha Machchindru | Jalada-astra prereetase ||

Ovee 71

भूतें सांडिती वैश्वानर । तरु कडकडती ज्वाळपर । ब्रह्मांडी उमाळा व्यापे थोर । पक्षिकुळ जीवजंतु ॥ ७१ ॥

Transliteration

Bhoote saanditee vaishvaanaru | Taru kadakadatee jvaalaparu | Brahmaandee umaalaa vyaape thoru | Pakshi kula jeevajantu ||

Ovee 72

ऐसी पाहतां पावकथाटी । परी जलदास्त्रें केली दाटी । उदधी मिरवूनि आकाशापाठी । शांत केला पावक तो ॥ ७२ ॥

Transliteration

Aisee paahataa paavaka-thaatee | Paree jaladaastre kelee daatee | Udadhee miravuuni aakaashaa-paathee | Shaanta kelaa paavaka toh ||

Ovee 73

यापरी मच्छिंद्रनाथ । पावकास्त्र प्रेरिता झाला विभूतिमंत्र । तेणें अग्नि प्रदीप्त करीत । भूतगणीं मिरवीतसे ॥ ७३ ॥

Transliteration

Yaaparee Machchindra-Naathu | Paavaka-astra preritaa jhaalaa vibhootee-mantru | Tene agni pradeepta kareetu | Bhootaganee miraveetase ||

Ovee 74

परी तो दृश्य अदृश्य जाणोनी । प्रळयाग्नि पाहती गुप्त होऊनी । मग पहा उदधितोया सांडोनी । आकाशांत मिरवूं त्या ॥ ७४ ॥

Transliteration

Paree toh drishya adrishya jaanonee | Pralaya agni paahatee gupta houunee | Maga pahaa udadhitoyaa saandonee | Aakaasha anta miravoo tyaa ||

Ovee 75

परी तो विझेना मंत्राग्न । मग मच्छिंद्रें जलदास्त्र प्रेरुन । शांत केला द्विमूर्धन । अस्त्रमंत्रे करुनियां ॥ ७५ ॥

Transliteration

Paree toh vijhenaa mantraagnu | Maga Machchindre jalada-astra prerunu | Shaanta kelaa dvi moordhanu | Astramantre karuniyaa ||

Ovee 76

शांत होताचि मंत्राग्नी । महीं उतरली भूतगणीं । मग स्पर्शास्त्र जल्पोनी । भूतांगणीं कल्पीतसे ॥ ७६ ॥

Transliteration

Shaanta hotaachi mantraagnee | Mahee utaralee bhootaganee | Maga sparsha astra jalponee | Bhootaanganee kalpeetase ||

Ovee 77

तेणेंकरुनि अष्टकोटी । महीं व्यक्त झाली एकथाटी । जैसी पूर्वी भूतांते राहटी । तेंचि झालें सर्वांस ॥ ७७ ॥

Transliteration

Tenenkaruni ashta kotee | Mahee vyakta jhaalee ekathaatee | Jaisee poorvee bhootaante raahatee | Tenchi jhaale sarvaansu ||

Ovee 78

परी अष्टजन जे तयांचे नृप । महाबळी प्रतापदर्प । ते स्पर्शास्त्र न गणती माप । स्वबळें मिरविती ॥ ७८ ॥

Transliteration

Paree ashtajana je tayaanche nripu | Mahaa balee prataapa-darpu | Tey sparsha astra na ganatee maapu | Svabale miravitee ||

Ovee 79

परी स्पर्शास्त्रें एकचि केलें । अदृश्य सकळ तेज खंडूनि धरिलें । हें तों नेणोनि निकट आले । मच्छिंद्राते आकळावया ॥ ७९ ॥

Transliteration

Paree sparsha astre ekachi kele | Adrishya sakala teja khanduuni dharile | Hey toh nenoni nikata aale | Machchindraate aakalaavayaa ||

Ovee 80

परी भोवतें आहे वज्र संपन्न । लाग न चाले कांहीं तेणें । परी परम बलाढ्य वेताळसंधान । निकट अंगें पातले ॥ ८० ॥

Transliteration

Paree bhovate aahe Vajra sampannu | Laaga na chaale kaanhee tene | Paree parama balaadhya Vetaala-sandhaanu | Nikata ange paatale ||

Ovee 81

परी भोंवतें आहे वज्रास्त्र । तेंचि गिळूनि गेला मुखपात्र । हें मच्छिंद्र पाहता अति विचित्र । वासवास्त्र सोडीतसे ॥ ८१ ॥

Transliteration

Paree bhovate aahe vajraastru | Tenchi giluuni gelaa mukha paatru | Hey Machchindra paahataa ati vichitru | Vaasava-astra sodeetase ||

Ovee 82

वासवास्त्र होतां प्रगट । उभयतांची झाली झगट । जैसे जेठी लागूनि येत पाठ । लोंबी झोंबी खवळले ॥ ८२ ॥

Transliteration

Vaasava-astra hotaa pragatu | Ubhayataanchee jhaalee jhagatu | Jaise jethee laaguuni yeta paathu | Lombee jhombee khavalale ||

Ovee 83

एकमेकां महीं पाडिती । तेणें दणाणा उठे क्षितीं । अष्टसमुद्र हेलावती । खळबळती नक्षत्रें पै ॥ ८३ ॥

Transliteration

Ekamekaa mahee paaditee | Tene danaanaa uthe kshitee | Ashta samudra helaavatee | Khalabalatee nakshatre pai ||

Ovee 84

शेषमस्तकें हेलावती । कूर्म म्हणे त्या अति अद्भुती । वराह सांवरुनि नेटे दंती । महीलागी उचलीतसे ॥ ८४ ॥

Transliteration

Shesha-mastake helaavatee | Koorma mhane tyaa ati adbhutee | Varaaha saavaruni nete dantee | Mahee-laagee uchaleetase ||

Ovee 85

येरीकडे सप्तजन । कवळूं पाहती मच्छिंद्राचे चरणीं । कीं चरणीं धरुनि महीकारण । मच्छिंद्रनाथ आकळावा ॥ ८५ ॥

Transliteration

Yereekade saptajanu | Kavaloo paahatee Machchindraache charanee | Kee charanee dharuni mahee kaaranu | Machchindra-Naatha aakalaavaa ||

Ovee 86

परी तो नाथ अति चपळ । पुनः वज्रास्त्र सिद्ध केले सबळ । दाही दिशा रक्षपाळ । ऐसें वज्रास्त्र मिरविलें ॥ ८६ ॥

Transliteration

Paree toh Naatha ati chapalu | Puna Vajra-astra siddha kele sabalu | Daahee dishaa rakshapaalu | Aise Vajra-astra miravile ||

Ovee 87

यावरी तो दानवास्त्र जल्पून । दानव केले सप्त निर्माण । मधु तिल कुंभकर्ण । मरु आणि मालीमल ॥ ८७ ॥

Transliteration

Yaavaree toh daanava astra jalpuunu | Daanava kele sapta nirmaanu | Madhu tila Kumbhakarnu | Maru aani Maaleemalu ||

Ovee 88

मुचकुंद त्रिपुर बळजेठी । ऐसी सप्तदानवहाटी । साती देवतें बळजेठी । लोंबी झोंबी पातले ॥ ८८ ॥

Transliteration

Muchakunda Tripura balajethee | Aisee sapta daanava haatee | Saatee devate balajethee | Lombee jhombee paatale ||

Ovee 89

झोटिंगातें मधु झगटे । खेळताती कुंभक नेटें । बाबरातें कुंभकर्ण लोटे । झोटधरणी झगडती ॥ ८९ ॥

Transliteration

Jhotingaate Madhu jhagate | Khelataatee kumbhaka nete | Baabaraate Kumbhakarna lote | Jhota-dharanee jhagadatee ||

Ovee 90

म्हंमदालागीं मरु भिडत । मालीमल मुंज्यातें आल्हाटीत । म्हैसासुर अति मुचकुंद उन्मत्त । त्यातें भिडतसे ॥ ९० ॥

Transliteration

Mhammadaa-laagee Maru bhidatu | Maaleemala Munjyaate aalhaateetu | Mhaisaasura ati Muchakunda unmattu | Tyaate bhidatase ||

Ovee 91

धुळोवान वीर समर्थ । त्रिपुर झगटे तया निरत । ऐसे एका मंत्री अस्त्र दैत्य । सप्तजन आल्हाटिले ॥ ९१ ॥

Transliteration

Dhulovaana veera samarthu | Tripura jhagate tayaa niratu | Aise ekaa mantree astra daityu | Saptajana aalhaatile ||

Ovee 92

ऐसे भिडतां अष्टजन । महीं उठला अति दणाण । एकमेकां महीकारण । आकळावया ते जल्पीती ॥ ९२ ॥

Transliteration

Aise bhidataa ashtajanu | Mahee uthalaa ati danaanu | Ekamekaa mahee kaaranu | Aakalaavayaa tey jalpeetee ||

Ovee 93

एक दिन एक रात्री । साती जया न विश्रांती । लाथा केवड हुमण्या देती । वर्मावर्मी जाणूनिया ॥ ९३ ॥

Transliteration

Eka dina eka raatree | Saatee jayaa na vishraantee | Laathaa kevada humanyaa detee | Varmaavarmee jaanuuniyaa ||

Ovee 94

तेणेंकरुनि प्रहार भेदीत । भेदितां देह विकळ होत । मुष्टिप्रहारें मूर्छित होत । महीं तडती आदळोनि ॥ ९४ ॥

Transliteration

Tenenkaruni prahaara bhedeetu | Bheditaa deha vikala hotu | Mushti-prahaare moorchita hotu | Mahee tadatee aadaloni ||

Ovee 95

मग साती जणें दानवास्त्र । भिडतां केले त्या जर्जर । मग सप्त दानव अदृश्यवर । होते झाले एकसरें ॥ ९५ ॥

Transliteration

Maga saatee jane daanava astru | Bhidataa kele tyaa jarjaru | Maga sapta daanava adrishya varu | Hote jhaale ekasare ||

Ovee 96

येरीकडे वासवशक्ती । भिडतां प्रेमें वेताळाप्रती । तों संधान पाहूनि हृदयस्थिती । वासवशक्ती भेदीतसे ॥ ९६ ॥

Transliteration

Yereekade Vaasava-Shaktee | Bhidataa preme Vetaalaa-pratee | Toh sandhaana paahuuni hridaya sthitee | Vaasava-Shaktee bhedeetase ||

Ovee 97

तेणें घायें अति सबळ । मूर्छित पडला वेताळ । महीं पडतां उतावेळ । अदृश्य झाली शक्ती ते ॥ ९७ ॥

Transliteration

Tene ghaaye ati sabalu | Moorchita padalaa Vetaalu | Mahee padataa utaavelu | Adrishya jhaalee shaktee tey ||

Ovee 98

येरीकडे मच्छिंद्रनाथ । वाताकर्षणविद्या जल्पत । तों सांवरोनि वेताळ मूर्छित । पुनरपि आला त्वरेनें ॥ ९८ ॥

Transliteration

Yereekade Machchindra-Naathu | Vaataa-karshana vidyaa jalpatu | Toh saavaroni Vetaala moorchitu | Punarapi aalaa tvarene ||

Ovee 99

येतां येतां सातीजणीं । लगट करिती निकट येऊनि । तो सिद्धप्रयोग वाताकर्षणी । मच्छिंद्राचा झालासे ॥ ९९ ॥

Transliteration

Yetaa yetaa saateejanee | Lagata karitee nikata yeuuni | Toh siddha prayoga vaataa-karshanee | Machchindra achaa jhaalaase ||

Ovee 100

सिद्धप्रयोग होतां नीती । संचारतो अष्टदेहांप्रती । तेणेंकरुनि वातगती । आकर्षण होतसे ॥ १०० ॥

Transliteration

Siddha prayoga hotaa neetee | Sanchaarato ashta-dehaam-pratee | Tenenkaruni vaatagatee | Aakarshana hotase ||

Ovee 101

जंव जंव आकर्षणवात होत । तंव हस्तपादांचे चलन राहत । परम क्लेश उचंबळत । मूर्छाशक्ती मिरवावया ॥ १०१ ॥

Transliteration

Java java aakarshana vaata hotu | Tava hasta-paadaanche chalana raahatu | Parama klesha uchambalatu | Moorchaa-shaktee miravaavayaa ||

Ovee 102

ऐसी होतांचि अष्टमावृत्ति । मग एकमेकांप्रती बोलती । आतां आसडूनि अहंवृत्ति । शरण वेगीं रिघावे ॥ १०२ ॥

Transliteration

Aisee hotaanchi ashtamaa-vritti | Maga ekamekaam-pratee bolatee | Aataa aasaduuni ahamvritti | Sharana vegee righaave ||

Ovee 103

नातरी जोगी आहे कठिण । भूतांसह आपुला घेईल प्राण । तरी यातें प्रसन्न करुन । जगामाजी नांदावें ॥ १०३ ॥

Transliteration

Naataree jogee aahe kathinu | Bhootaansaha aapulaa gheeela praanu | Taree yaate prasanna karunu | Jagaa maajee naandaave ||

Ovee 104

जैसें रामप्रसादेंकरुन । लंकाराणीव बिभीषण । की वालीचे कृतीनें । राज्यीं मिरवला सुग्रीव ॥ १०४ ॥

Transliteration

Jaise Raama-prasaaden-karunu | Lankaa-raaneeva Bibheeshanu | Kee Vaaleeche kriteene | Raajyee miravalaa Sugreeva ||

Ovee 105

तन्न्यायें येथे करुन । वांचवावा आपुला प्राण । उपरी जीवलिया संगोपन । आश्रय होईल हा एक ॥ १०५ ॥

Transliteration

Tannyaaye yethe karunu | Vaanchavaavaa aapulaa praanu | Uparee jeevaliyaa sangopanu | Aashraya hoeela haa eka ||

Ovee 106

जैसा दरिद्रियाला परिस । कीं चिंतामणी चिंतित्यास । कीं पीयुष लाभे रोगियास । तैसे होईल आपणासी ॥ १०६ ॥

Transliteration

Jaisaa daridriyaalaa parisu | Kee chintaa manee chintityaasu | Kee peeyusha laabhe rogiyaasu | Taise hoeela aapanaasee ||

Ovee 107

कीं प्रल्हादाचें नरसिंह दैवत । संकटी झालें साह्यवंत । तन्न्यायें आजही प्रीत । वाढवावी महाराजा ॥ १०७ ॥

Transliteration

Kee Pralhaadaache Narasimha daivatu | Sankatee jhaale saahya vantu | Tannyaaye aajahee preetu | Vaadhavaavee Mahaaraajaa ||

Ovee 108

ऐसें बोलूनि एकमेकां । निश्चय करुनि नेटका । म्हणती महाराजा तपोनायका । सीमा झाली प्रतापा ॥ १०८ ॥

Transliteration

Aise boluuni ekamekaa | Nishchaya karuni netakaa | Mhanatee Mahaaraajaa tapo-naayakaa | Seemaa jhaalee prataapaa ||

Ovee 109

तन्न्यायें सर्वज्ञमूर्ती । सोडवीं आम्हां क्लेशपद्धती । क्रोधानळें प्राणआहुती । योजू नको महाराजा ॥ १०९ ॥

Transliteration

Tannyaaye sarva-jnya moortee | Sodavee aamhaa klesha-paddhatee | Krodhaanale praana aahutee | Yojoo nako Mahaaraajaa ||

Ovee 110

तरी आतां अनन्य शरण । आहोंत आमुचा वाचवा प्राण । जैसें कचा शुक्रें दान । संजीवनीचें पैं केले ॥ ११० ॥

Transliteration

Taree aataa ananya sharanu | Aahonta aamuchaa vaachavaa praanu | Jaise kachaa Shukre daanu | Sanjeevanee che pai kele ||

Ovee 111

तूं प्रत्यक्ष अससी नारायण । हें नेणोनि रळी तुजकारण । केली परी उचित धन । प्राप्त झालें सध्याचि ॥ १११ ॥

Transliteration

Too pratyaksha asasee Naaraayanu | Hey nenoni ralee tuja kaaranu | Kelee paree uchita dhanu | Praapta jhaale sadhyaachi ||

Ovee 112

जैसा जटायु आणि संपाती । प्रताप दावू गेले गभस्ती । परी भोगदशाप्राप्ती । सध्यांचि झाली लाभावरी ॥ ११२ ॥

Transliteration

Jaisaa Jatayu aani Sampaatee | Prataapa daavoo gele gabhastee | Paree bhoga-dashaa-praaptee | Sadhyaanchi jhaalee laabhaa-varee ||

Ovee 113

तन्न्यायें येथें झालें । तरी कृपेचीं बसवीं पाउलें । चलनवलन अवघोचि राहिलें । बोलणें उरलें सांगावया ॥ ११३ ॥

Transliteration

Tannyaaye yethe jhaale | Taree kripechee basavee paaule | Chalanavalana avaghochi raahile | Bolane urale saangaavayaa ||

Ovee 114

आतां क्षणैक करिसी आळस । आम्ही जाऊं परठायास । तेणे लाभ तव हस्तास । काय मिरवेल तुजलागीं ॥ ११४ ॥

Transliteration

Aataa kshanaika karisee aalasu | Aamhee jaaoo paraa-thaayaasu | Tene laabha tava hastaasu | Kaaya miravela tujalaagee ||

Ovee 115

तरी आमुचा वांचवावा प्राण । मग नाम तुझे मिरवू जगाकारण । सांगशील तें कार्य करुन । भूतांसहित येऊं कीं ॥ ११५ ॥

Transliteration

Taree aamuchaa vaanchavaavaa praanu | Maga naama tujhe miravoo jagaa kaaranu | Saanga-sheela tey kaarya karunu | Bhootaan-sahita yeoo kee ||

Ovee 116

कीं यमें पाळिले यमदूत । किंवा विष्णु पुढें विष्णुगण धांवत । तन्न्यायें आम्ही भूतांसहित । तुजपुढें मिरवूं कीं ॥ ११६ ॥

Transliteration

Kee Yame paalile yamadootu | Kivaa Vishnu pudhe Vishnugana dhaavatu | Tannyaaye aamhee bhootaan-sahitu | Tujapudhe miravoo kee ||

Ovee 117

हें जरी म्हणशील खोटें । तरी पूर्वजां बुडवू नरककपाटें । आणि पंचपातकें महानेटें । निजमस्तकीं मिरवू कीं ॥ ११७ ॥

Transliteration

Hey jaree mhanasheela khote | Taree poorvajaa budavoo naraka-kapaate | Aani pancha-paatake mahaanete | Nija-mastakee miravoo kee ||

Ovee 118

गोहत्यारी ब्रह्महत्यारी । स्त्रीहत्यारी बाळहत्यारी । मातृपितृगुरुहत्यारी । पंचपातकें मस्तकीं मिरवू कीं ॥ ११८ ॥

Transliteration

Gohatyaaree Brahma-hatyaaree | Stree-hatyaaree baala-hatyaaree | Maatri-pitri-guru-hatyaaree | Pancha-paatake mastakee miravoo kee ||

Ovee 119

ऐशीं पातकें रौरव क्षितीं । भोग मिरवू संवत्सरअयूती । यातें साक्ष चित्रगुप्ती । लीनमुखपदा मिरवू कां ॥ ११९ ॥

Transliteration

Aishee paatake raurava kshitee | Bhoga miravoo savatsara-aayootee | Yaate saaksha Chitragupti | Leena-mukhapadaa miravoo kaa ||

Ovee 120

ऐसे आमुचे बोल निश्चित । काया वाचा धरुनि निश्चित । तरी आतां होई कृपावंत । दयालहरी मिरवावी ॥ १२० ॥

Transliteration

Aise aamuche bola nishchitu | Kaayaa vaachaa dharuni nishchitu | Taree aataa hoee kripaa vantu | Dayaa-laharee miravaavee ||

Ovee 121

यावरी बोले मच्छिंद्रनाथ । साबरीविद्या मम कवित्व । त्यातें साह्य भूतांसहित । कार्यार्थी तुम्ही असावें ॥ १२१ ॥

Transliteration

Yaavaree bole Machchindra-Naathu | Saabaree Vidyaa mama kavitvu | Tyaate saahya bhootaan-sahitu | Kaarya arthee tumhee asaave ||

Ovee 122

जो जो मंत्र जया प्रकरणीं । तरी त्या अर्थी तुम्ही वर्तोनी । साह्य करावें मंत्रालागुनी । कोणीतरी घोकिलिया ॥ १२२ ॥

Transliteration

Jo jo mantra jayaa prakaranee | Taree tyaa arthee tumhee vartonee | Saahya karaave mantraa-laagunee | Koneetaree ghokiliyaa ||

Ovee 123

मग अष्टही म्हणती अवश्य । कार्य करुं निःसंशयास । मग साधनप्रयोग आपुला भक्ष । पृथक पृथक सांगितला ॥ १२३ ॥

Transliteration

Maga ashtahee mhanatee avashyu | Kaarya karu nihsanshayaasu | Maga saadhana-prayoga aapulaa bhakshu | Prithaka prithaka saangitalaa ||

Ovee 124

अष्टकोटी भूतावळीसहित । भक्षसाधन सांगितलें समस्त । येणें पंथें कार्य जगांत । निश्चयें आम्ही मिरवू कीं ॥ १२४ ॥

Transliteration

Ashta kotee bhootaavalee-sahitu | Bhaksha-saadhana saangitale samastu | Yene panthe kaarya jagaantu | Nishchaye aamhee miravoo kee ||

Ovee 125

पूजा पुरस्कर अभ्युत्थान । मंत्रासहित निर्वाण । मंत्र उजळला स्थापूनि ग्रहण । पर्वणीतें नेमिलें ॥ १२५ ॥

Transliteration

Poojaa puraskara abhyutthaanu | Mantraa sahita nirvaanu | Mantra ujalalaa sthaapuuni grahanu | Parvaneete nemile ||

Ovee 126

ऐसा निश्चय सांग होतां । मग बळें प्रेरकास्त्र प्रेरितां । समूळ नासूनि गेली वार्ता । आकर्षण अस्त्राची ॥ १२६ ॥

Transliteration

Aisaa nishchaya saanga hotaa | Maga bale preraka-astra preritaa | Samoola naasuuni gelee vaartaa | Aakarshana astra achee ||

Ovee 127

येरीकडे अष्टकोटी भुतावळ । जोगिणी इत्यादि सकळ । स्पर्शू पाहती चरणकमळ । महीं व्यक्त होऊनिया ॥ १२७ ॥

Transliteration

Yereekade ashta kotee bhutaavalu | Joginee ityaadi sakalu | Sparshoo paahatee charana-kamalu | Mahee vyakta houuniyaa ||

Ovee 128

तेव्हां जल्पूनि विमुक्तास्त्र । मुक्त केले पिशाच सर्वत्र । मग मच्छिंद्रपद नमूनि पवित्र । सन्मुख उभे राहती ॥ १२८ ॥

Transliteration

Tevhaa jalpuuni vimukta-astru | Mukta kele pishaacha sarvatru | Maga Machchindra-pada namuuni pavitru | Sanmukha ubhe raahatee ||

Ovee 129

बद्धांजुळी उभय कर । उभे असती ते समोर । वाणी वदले जयजयकार । धन्य मच्छिंद्र म्हणोनी ॥ १२९ ॥

Transliteration

Baddha-anjulee ubhaya karu | Ubhe asatee tey samoru | Vaanee vadale jaya jaya kaaru | Dhanya Machchindra mhanonee ||

Ovee 130

मग त्या मंडळींत मच्छिंद्र । कैसा शोभला मूर्तिमंत । जेवीं नक्षत्रांमाजी तेजोमंत । शशिनाथ मिरवला ॥ १३० ॥

Transliteration

Maga tyaa mandaleenta Machchindru | Kaisaa shobhalaa moortimantu | Jevee nakshatraam-maajee tejomantu | Shashi Naatha miravalaa ||

Ovee 131

कीं रश्मिपालमंडळांत । तेजें गहिंवरला प्रभे आदित्य । कीं सुरवरगणी शचीनाथ । स्वर्गामध्यें मिरवला ॥ १३१ ॥

Transliteration

Kee rashmi-paala-mandalaantu | Teje gahivaralaa prabhe Aadityu | Kee sura-vara-ganee Shachee-Naathu | Svargaa-madhye miravalaa ||

Ovee 132

कीं शिवगण समुदायीं । परम शोभत नगजावई । कीं विष्णुगुणांत शेषशायी । प्रभुत्वपणीं मिरवला ॥ १३२ ॥

Transliteration

Kee Shivagana samudaayee | Parama shobhata nagajaavaee | Kee Vishnu guna anta Sheshashaayee | Prabhutva-panee miravalaa ||

Ovee 133

कीं दानवांमाजी उशमनामूर्ती । कीं देवामाजी बृहस्पती । कीं पूतनेमाजी ऐरावती । देवांगणीं मिरवितसे ॥ १३३ ॥

Transliteration

Kee daanavaam-maajee Ushamanaa-moortee | Kee devaa maajee Brihaspatee | Kee Pootane-maajee airaavatee | Deva anganee miravitase ||

Ovee 134

तेवीं पिशाचमंडळांत । परम शोभला मच्छिंद्रनाथ । मग सकळांच्या मस्तकीं ठेवूनि हात । म्हणे क्षेमवंत असावे ॥ १३४ ॥

Transliteration

Tevee pishaacha mandala antu | Parama shobhalaa Machchindra-Naathu | Maga sakalaanchyaa mastakee thevuuni haatu | Mhane kshemavanta asaave ||

Ovee 135

अष्टजण मुख्य नायक । ते बोलति बोलावून सकळिक । कीं मच्छिंद्र कार्य श्लोक । जनउपकारा वदला असे ॥ १३५ ॥

Transliteration

Ashtajana mukhya naayaku | Tey bolati bolaavuuna sakaliku | Kee Machchindra kaarya shloku | Jana upakaaraa vadalaa ase ||

Ovee 136

तरी त्याचा धाक कोणी । तया साह्य पिशाच असावें येऊनी । सांगितलें याचें कार्य द्या करुनि । मंत्रोच्चार होतांचि ॥ १३६ ॥

Transliteration

Taree tyaachaa dhaaka konee | Tayaa saahya pishaacha asaave yeuunee | Saangitale yaache kaarya dyaa karuni | Mantra-uchchaara hotaanchi ||

Ovee 137

ऐसें ऐकोनियां भूतें । अवश्य म्हणती जोडोनि हात । यावरी बोले मच्छिंद्रनाथ । आणिक वर मज द्यावा ॥ १३७ ॥

Transliteration

Aise aikoniyaa bhoote | Avashya mhanatee jodoni haatu | Yaavaree bole Machchindra-Naathu | Aanika vara maja dyaavaa ||

Ovee 138

तुमचें आमुचें समरांगण । झाले सबळ बळेंकरुन । त्या समरांगणाचें कथन । लोकीं ऐसें मिरविलें ॥ १३८ ॥

Transliteration

Tumache aamuche samara-anganu | Jhaale sabala balenkarunu | Tyaa samara-anganaache kathanu | Lokee aise miravile ||

Ovee 139

तरी तें आख्यान वाचितां । तया न करावी बाधा सर्वथा । आणि हें आख्यान संग्रहीं पाळितां । प्रिय मानावा तो पुरुष ॥ १३९ ॥

Transliteration

Taree tey aakhyaana vaachitaa | Tayaa na karaavee baadhaa sarvathaa | Aani hey aakhyaana sangrahee paalitaa | Priya maanaavaa toh purusha ||

Ovee 140

त्यासी जरी संकट येतां । निवारण करावें तुम्हीं सर्वथा । आणि आपुलेकडूनि सहसा व्यथा । जाणूनि त्या पुरुषा करुं नये ॥ १४० ॥

Transliteration

Tyaasee jaree sankata yetaa | Nivaarana karaave tumhee sarvathaa | Aani aapule kaduuni sahasaa vyathaa | Jaanuuni tyaa purushaa karu naye ||

Ovee 141

हें आख्यान राहे जया सदनीं । तेथें बसूं नये सहसा भूतांनीं । जैसे भाद्रपदशुद्ध चतुर्थीदिनीं । चंद्रालागीं न देखती ॥ १४१ ॥

Transliteration

Hey aakhyaana raahe jayaa sadanee | Tethe basoo naye sahasaa bhootaannee | Jaise Bhaadrapada-shuddha chaturthee-dinee | Chandraa laagee na dekhatee ||

Ovee 142

कीं अविंध जेवीं का सूकर । कीं श्वान मानिती अशुद्ध विप्र । तेवीं तें मानूनि सर्वत्र । दूरदेशा असावें ॥ १४२ ॥

Transliteration

Kee avindha jevee kaa sookaru | Kee shvaana maanitee ashuddha vipru | Tevee tey maanuuni sarvatru | Dooradeshaa asaave ||

Ovee 143

ऐसें आणूनि चित्तीं । तें सदन स्पर्शू नये भूतीं । अस्पर्श होतां व्यथा किंचित । होणार नाहीं भूतांची ॥ १४३ ॥

Transliteration

Aise aanuuni chittee | Tey sadana sparshoo naye bhootee | Asparsha hotaa vyathaa kinchitu | Honaara naahee bhootaanchee ||

Ovee 144

यावरी प्रशस्तपणें राहून । जरी त्या सदना आलें विघ्न । तयाचें करावें निवारण । सकळ भूतें मिळोनियां ॥ १४४ ॥

Transliteration

Yaavaree prashasta-pane raahuunu | Jaree tyaa sadanaa aale vighnu | Tayaache karaave nivaaranu | Sakala bhoote miloniyaa ||

Ovee 145

आणि तया घरचें मनुष्य व्यर्थ । जरी भेटलें जातां मार्गांत । तरी मार्ग सोडूनी निश्चित । दूर मार्गी बैसावें ॥ १४५ ॥

Transliteration

Aani tayaa gharache manushya vyarthu | Jaree bhetale jaataa maarga antu | Taree maarga soduunee nishchitu | Doora maargee baisaave ||

Ovee 146

हें आख्यान जो पाळिता । त्यासी कदाकाळीं न करावी व्यथा । हेंचि द्यावें मज सर्वथा । कृपा करुनि सर्वांनीं ॥ १४६ ॥

Transliteration

Hey aakhyaana jo paalitaa | Tyaasee kadaa-kaalee na karaavee vyathaa | Henchi dyaave maja sarvathaa | Kripaa karuni sarvaanee ||

Ovee 147

ऐसी ऐकूनि मच्छिंद्रउक्ती । अवश्य करुं सकळ म्हणती । त्या सदनातें व्यथा निश्चितीं । आम्ही न करुं सहसाही ॥ १४७ ॥

Transliteration

Aisee aikuuni Machchindra-uktee | Avashya karu sakala mhanatee | Tyaa sadanaate vyathaa nishchitee | Aamhee na karu sahasaahee ||

Ovee 148

ऐसे वदूनि वरदभूत । नमिता झाला मच्छिंद्रनाथ । सर्व नमूनि पुसून त्यातें । स्वस्थानें चालिले ॥ १४८ ॥

Transliteration

Aise vaduuni varada-bhootu | Namitaa jhaalaa Machchindra-Naathu | Sarva namuuni pusuuna tyaate | Svasthaanete chaalile ||

Ovee 149

अष्टकोटी पिशाचांसहित । अष्ट विराजे मुख्य दैवत । तेही नमूनि मच्छिंद्राप्रत । स्वस्थानासी पै गेले ॥ १४९ ॥

Transliteration

Ashta kotee pishaachaan-sahitu | Ashta viraaje mukhya daivatu | Tehee namuuni Machchindraa-pratu | Svasthaanaasee pai gele ||

Ovee 150

येरीकडे मच्छिंद्रनाथ सत्वर । पाहता झाला बारामल्हार । तेथीचा विधी करुनि सर्व । कुमारी दैवतीं चालिला ॥ १५० ॥

Transliteration

Yereekade Machchindra-Naatha satvaru | Paahataa jhaalaa Baaraamalhaaru | Tetheechaa Vidhee karuni sarvu | Kumaaree daivatee chaalilaa ||

Ovee 151

तैसीच पावे कालिका भवानी । ते कथा पावेल मच्छिंद्रालागुनी । ते पुढिले अध्यायीं अवधान देऊनि । कथा श्रोते स्वीकारा ॥ १५१ ॥

Transliteration

Taiseecha paave Kaalika Bhavaanee | Tey kathaa paavela Machchindraalaagunee | Tey pudhile adhyaayee avadhaana deuuni | Kathaa shrote sveekaaraa ||

Ovee 152

अहो ह्या कथासारग्रंथास । परिकर पंचम अध्याय घोकिल्यास । पिशाचबाधा तयासी खास । होणार नाही सहसाही ॥ १५२ ॥

Transliteration

Aho hyaa kathaa-saara-granthaasu | Parikara panchama-adhyaaya ghokilyaasu | Pishaacha baadhaa tayaasee khaasu | Honaara naahee sahasaahee ||

Ovee 153

जरी पहिली बाधा असेल । तरी पठण करितां जाईल । प्रथम अध्याय जो घोकील । त्याचा अंगरोग जाईल कीं ॥ १५३ ॥

Transliteration

Jaree pahilee baadhaa aselu | Taree ti pathana karitaa jaaeelu | Prathama adhyaaya jo ghokeelu | Tyaachaa angaroga jaaeela kee ||

Ovee 154

दुसरा अध्याय घोकिल्यापासून । विद्याभ्यास होईल पूर्ण । तिसरा अध्याय घोकितां प्रसन्न । होईल अंजनीसुत तयांतें ॥ १५४ ॥

Transliteration

Dusaraa adhyaaya ghokilyaa-paasuunu | Vidyaa-abhyaasa hoeela poornu | Tisaraa adhyaaya ghokitaa prasannu | Hoeela Anjaneesuta tayaante ||

Ovee 155

चवथा अध्याय घोकिता फळ । कार्य निवटील परम सकळ । मान्यता देईल महीपाळ । मौन पडेल सर्वांतें ॥ १५५ ॥

Transliteration

Chavathaa adhyaaya ghokitaa phalu | Kaarya nivateela parama sakalu | Maanyataa deeela mahee paalu | Mauna padela sarvaante ||

Ovee 156

असो ऐसे पंचम प्रसंग । मंत्रसंजीवनी अनुराग । धुंडीसुत मालूजी सांगे । वदे नरहरिकृपेकरुनियां ॥ १५६ ॥

Transliteration

Aso aise panchama prasangu | Mantra sanjeevanee anuraagu | Dhundeesuta maaloojee saange | Vade Narahari kripe karuni yaa ||

Ovee 157

स्वस्ति श्रीभक्तिकथासार । संमत गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । पंचमाध्याय गोड हा ॥ १५७ ॥

Transliteration

Svasti Shreebhaktikathaa Saaru | Sammata Goraksha Kaavya kimayaa gaaru | Sadaa parisota bhaavika chaturu | Panchama Adhyaaya goda haa ||

श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।

Shri Krishnarpanamastu | Shri Dattatreyarpanamastu

इति श्रीनवनाथभक्तिसार पंचमाध्याय संपूर्ण ।

Iti Shri Navnath Bhaktisar Adhyaya Panchama Sampurnah